# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## जाहीर आवाहन

दि. ८/१२/२०२२

विषय : राज्यातील मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांचे मराठी वाचन कौशल्य विकसित होण्यासाठी इच्छुक स्वयंसेवी /प्रकाशन संस्थांकडून वाचन साहित्य/पुस्तके नमुना प्रती पुरविणे बाबत ...

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत STARS प्रकल्पांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान उपक्रम अंतर्गत राज्यातील मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांचे **मराठी वाचन कौशल्य** विकसित होण्यासाठी राज्यातील शाळांना पूरक स्तराधारित वाचन (Graded Reading)साहित्य देणे प्रस्तावित आहे. त्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर विषयात काम केलेल्या स्वयंसेवी /प्रकाशन संस्थांकडून त्यांनी त्यासाठी विकसित केलेले वाचन साहित्य /पुस्तके नमुना प्रती विनाशुल्क स्वरूपात परिषदेत सादर करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

- साहित्य सादर करण्याबाबतच्या अटी व शर्ती

१. सदर वाचन साहित्य हे मराठी भाषेत असावे.
२. सदर वाचन साहित्य हे वय वर्ष ६ ते८ वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या वयोगटास व भावविश्वास अनुरूप असावे.
३. सदर साहित्य हे मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली व दुसरीच्या वर्गामध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे मराठी भाषेचे वाचन कौशल्य विकसित होईल अशा स्तराधिष्ठित (Graded Reading)स्वरूपाचे असावे.
४. सदर साहित्याच्या आधारे संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी काही प्रकल्प, उपक्रम केलेला असावा.
५. सादर करावयाच्या प्रत्येक साहित्याची एक हार्ड कॉपी व साहित्याची निवड झाल्यास छपाई स्वरूपात आवश्यक असणारी open ready to print सॉफ्ट कॉपी द्यावी लागेल .
६. मुदतीत प्राप्त झालेल्या वाचन साहित्यामधून तज्ज्ञ समितीमार्फत योग्य वाचन साहित्याची तथा पुस्तकांची निवड केली जाणार आहे.
७. त्यानंतर गरजेनुसार सदर साहित्याचे संपादन केले जाणार आहे. ह्या संपादनामध्ये आवश्यकतेनुसार साहित्यातील आशय, मुखपृष्ठ, मलपृष्ठ, चित्रे यामध्ये बदल केला जाईल व आवश्यकतेनुसार नवीन मजकुराचाही समावेश केला जाईल. त्यानंतर आवश्यक संख्येनुसार सदर साहित्याची छपाई या कार्यालयामार्फत केली जाणार आहे. साहित्यातील या बदलाबाबत संबंधित संस्थेला कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

८. निवड झालेल्या साहित्या बाबत कुठलाही स्वामित्वनिधी, कॉपीराईट निधी, कोणतेही मानधन संबंधित संस्थेस किंवा सदर साहित्याचे लेखन केलेल्या लेखकांना तसेच चित्रकारांना दिले जाणार नाही म्हणजेच ही सर्व प्रक्रिया विनाशुल्क असेल.

९. तथापि संस्थेच्या नावाचा तसेच लेखक किंवा चित्रकाराच्या नावाचा योग्य ती नोंद सदर संपादित व छापी करावयाच्या साहित्यात घेणेबाबत निर्णय या कार्यालयाकडून घेण्यात येईल. कार्यालयाकडून घेतलेला निर्णय संबंधित संस्थेस, लेखक व चित्रकारांना मान्य असेल.

१०. संस्थांनी दिलेल्या व निवड झालेल्या साहित्याचा उपयोग महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे मराठी भाषा वाचन कौशल्य विकास होण्यासाठी केला जाणार आहे. या दृष्टीने विधायक दृष्टिकोन ठेवूनच साहित्य देण्यात यावे.

११. पुस्तक तथा वाचन साहित्य निवड संदर्भात सर्वाधिकार संबंधित तज्ज्ञ समितीस आहेत. त्यामुळे संस्थांनी दिलेले वाचन साहित्य /पुस्तके न स्वीकारण्याची कारणे संबंधित संस्थांना कळविण्यात येणार नाहीत.

१२. संस्थेने सादर केलेल्या वाचन साहित्याची निवड होवो अथवा न होवो, सादर केलेली पुस्तके संबंधित संस्थेस परत देण्यात येणार नाहीत.

१३. सदर साहित्याच्या आधारे संस्थेने यापूर्वी विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकास करण्याचा उपक्रम राबविलेला असल्यास व त्या संदर्भातील फलनिष्पत्ती उपलब्ध असल्यास साहित्यासोबत सारांश स्वरूपात सादर करावी.

१४. सदर साहित्यासोबत अटी व शर्ती मान्य असलेले प्रमाणपत्र.(परिशिष्ट अ व ब ) तसेच सोबत इतर आवश्यक माहितीची कागदपत्रे सादर करावीत.संस्थेच्या त्यांच्या स्वतःच्या काही अटी,शर्ती असतील तर त्याही कृपया साहित्यासोबत सादर कराव्यात. योग्य त्या अटी, शर्तींचा विचार केला जाईल.

वरील सर्व अटी व शर्ती समजून घेऊन इच्छुक संस्थांनी आपले वाचन साहित्य ही जाहिरात प्रसिद्ध केल्यापासून दहा दिवसाच्या आत प्रस्तुत कार्यालयाच्या मराठी विभागात समक्ष सादर करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे .

कार्यालयाचा पत्ता -
मराठी भाषा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,
कुमठेकर मार्ग , पुणे -४११०३०
संपर्क क्रमांक -(०२०) २४४७ ६९३८
E-mail: marathilangdept@maa.ac.in

- अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र खालील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे.

(परिशिष्ट अ)

अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र

मी, श्री/ श्रीम. ______________________________ पदनाम :____________
संस्थेचे नाव : ______________________________ पत्ता: ____________

______________________________ प्रमाणपत्र सादर करतो की, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था,महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या संकेतस्थळावर दि. ____________ रोजी प्रसिद्ध झालेली **राज्यातील मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांचे मराठी भाषा वाचन कौशल्य विकसित होण्यासाठी राज्यातील शाळांना पूरक स्तराधारित वाचन साहित्य देण्याबाबतच्या** जाहिरातीचे वाचन केले असून सदर जाहिरातीत नमूद सर्व अटी व शर्ती संस्थेस मान्य असून त्यानुसारच सदर संस्थेकडून विकसित करण्यात आलेले वाचन साहित्य नमुना प्रती कार्यालयास सादर करीत आहोत.

**स्थळ :**

दिनांक : (स्वाक्षरी)

नाव:

पदनाम :

संस्थेचे नाव :

- ना हरकत प्रमाणपत्र खालील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे.

(परिशिष्ट ब)

ना हरकत प्रमाणपत्र

राज्यातील मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित होण्यासाठी राज्यातील शाळांना पूरक स्तराधारित वाचन साहित्य देण्यासंदर्भात उपयोगात आणलेल्या आमच्या वाचन साहित्याबाबत आमचे संस्थेस, त्य साहित्याच्या लेखकास व चित्रकारास मानधन, कॉपीराईट तथा स्वामित्व निधी संदर्भात कोणतीही रक्कम /आर्थिक मोबदला मिळणार नाही याबाबत पूर्ण कल्पना असून त्याबाबत संस्थेचा कोणताही आक्षेप नाही. तसेच याबाबत सादर केलेल्या साहित्याचे लेखक व चित्रकार यांना आमचे स्तरावरून अवगत केले आहे. त्यांचाही याबाबत कोणताही आक्षेप नाही.

स्थळ :

दिनांक : (स्वाक्षरी)

नाव:

पदनाम :

संस्थेचे नाव :